# भारतीय राज्यघटना व धर्मनिरपेक्षता

**ज्योती रमेश कांबळे,** संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यानंतर जेव्हा पाकिस्तान धर्माधिष्ठित राष्ट्र म्हणून स्थापन झाले, तेव्हा भारताने आपली धर्मनिरपेक्षतेशी पुर्वापार असलेली बांधिलकी अधिक बळकट केली. देश पुन्हा धर्मावरून दुभंगू नये, प्रत्येकाला आपली संस्कृती व धर्म सांभाळण्याचे स्वातं ज्य असावे अशी काळजी भारतीय संविधनाच्या शिल्पकारांनी घेतली, मात्र आज भारतात धर्मनिरपेक्षतावादाची बीजे रोवतांना धार्मिकता आणि धर्मांधता यांच्यातील फरक ओळखणे आश्यक झालेले आहे. पण सदरच्या शासकीय यंत्रणा व राजकीय पक्ष याकडे जाणून बुजून दर्लक्ष करताना दिसते. प्रत्यक्षात धर्म आणि राजकारण या दोन गोष्टी भिन्न स्वरूपाच्या आहेत. वास्तविक समाजजीवनाच्या परिपूर्ततेसाठी धर्म आणि राजकारण या आवश्यक आहेत. भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता या तत्वाचा गैरवापर राजकीय पक्ष करताना दिसून येत आहे. मार्गदर्शक तत्वांमध्ये घटनाकारांनी धर्मनिरपेक्षतेचा जो सकारात्मक आशय सांगितला आहे त्याची अमंलबंजावणी होण्याची गरज आज आहे.

**राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेचा अर्थ :**

भारतीय घटनेच्या २५ व्या कलमामध्ये धर्मनिरपेक्षतेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. यामध्ये भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्मपालनाचा, पारलौकिक कल्याणाचा, आध्यात्मिक उन्नतीचा पूर्ण अधिकार आहे. वरील अधिकारात धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार नाही तसेच मदत व विराधही करणार नाही. वरील अधिकारात धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार नाही तसेच मदत व विरोधही करणार नाही. समाजिक व राजकीय जीवनात व्यक्ती – व्यक्तीमध्ये धर्माच्या नावाने भेदभाव केला जाणार नाही.

मात्र संकुचित अर्थानेही धर्माचा नाश घडवून आणणे, धर्माला जीवनातून हद्पार करणे असा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ नाही. सामाजिक व्यवहारात धर्माला प्रवेश नाही. एवढाच धर्म निरपेक्षतेचा अर्थ आहे असे मानले जाते.

वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनात उपस्थित होणारे प्रश्न सोडवितांना त्यांच्याकडे धर्मनिरपेक्ष दृष्टीन म्हणजेच मानवाच्या ऐहिक कल्याणाच्या दृष्टीकोनातून पाहावे. मग ते प्रश्न नती, शिक्षण, अर्थव्यवस्था, राजकीय व सामाजिक संस्था इ. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील असोत, या भूमिकेला धर्मनिरपेक्षता म्हणतात. भारतीय घटनेने भूमिकेला धर्मनिरपेक्षता म्हणतात. भारतीय घटनेने धर्मातील राज्याचा (धर्मनिरपेक्षतेचा) पुरस्कार केलेला आहे. घटनाकारांनी धर्मातील हा शब्द घटनेत समाविष्ट केलेला नव्हाता. तरीपण घटनेच्या तिसऱ्या विभागात मुलभूत अधिकार देऊन धर्मनिरपेक्ष राज्याच्या निर्मितीची अपेक्षा केलेली आहे. समानतेच्या अधिकार देताना नागरिकांच्या धर्माचा विचार केला जात नाही. धर्म, वंश, लिंग, भाषा, वास्तव्य असा कोणताही भेदभाव न मानता व्यक्तीला समतेचा आधिकार दिलेला आहे. तसेच घटनेने २५ व २६ व्या कलमांत धार्मिक स्वांतत्र्याचा अधिकार स्पष्ट केलेला आहे. १९७६ साली झालेल्या ४२ व्या घटनादुरूस्तीने िारतीय घटनेच्या सरनाम्यात धर्मातील हया नव्या शब्दाचा समावेश केलेला आहे. भारतात हिंदू, शीख, बौध्द, जैन, ज्यू, खिृचन, पारशी इत्यादी धर्मांचे लोक राहतात. भारतात कोणतयाही एका धर्माला महत्व दिलेले नाही. सर्व धर्मांना समान मानले आहे. भारत हे राष्ट्र धर्माधिष्ठित राज्य नाही ते धर्मवाहय राज्य नाही, तर ते धर्मनिरपेक्ष राज्य आहे.

**धर्मनिरपेक्षतेच्या होणारा गैरवापर/सदय परिस्थिती:**

भारतीय घटनेने नागरिकांना धार्मिक स्वांतत्र्य दिले असले तरी या स्वातंत्र्यावर काही प्रमाणात मर्यादा घातलेल्या आहेत. घटनेने सामाजिक सुधारणा, जनता पक्ष, आताचा

जनतादल, मार्क्सवादी व भारतीय साम्यावादी पक्ष हे धर्मनिपेख धोरणाचा पुरस्कार करणारे पक्ष आहेत असे म्हणणे अर्थिक संयुक्तिक ठरेल.

राष्ट्रहित, सार्वजनिक व्यवस्था व नीतिमत्ता या दृष्टीकाणातून धार्मिक स्वातंञ्यावर निर्बंध घालण्याचे आधिकार राज्याला दिले आहेत. धर्मनिरपेक्षता हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे कारण भारतासारख्या भिन्न धर्मीय लोकांच्या राज्यात केवळ धर्मनिरपेक्ष राज्यच टिकू शकेल धर्माधिष्ठित किंवा धर्मबाहय राज्याची कल्पना ही भारताच्या राष्ट्रीय एकात्मतला तडा देणारी ठरेल. भारतात सरकारने धार्मिक स्वांतञ्याच्या हक्कावर निर्बंध घातले असेल तरी प्रत्यक्षात धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती झालेली नाही. कारण सर्वच राजकीय पक्ष व संघटना धर्मात्वावादी राजकारण करताना दिसतात. सामान्यत: हिंदू महासभा, जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघं, जमाते इस्लाम, मुस्लिम लीग, अकाली दल इत्यादी पक्ष व संघटनांना धर्मनिर्पेक्ष राज्याच्या विरोधी समजले जाते. पण या पक्षांना टीका करणे योग्य नाही स्वांतंञ्योत्तर काळात कॉग्रेस पक्षासहित सर्वच राजकीय पक्ष कमी—अधिक प्रमाणात धर्माधतेचे राजकारण करताना दिसतात.

निवडणूकांच्या काळामध्ये प्रामुख्याने राजकीय पक्ष धार्मीक गोष्टींना हाताशी घेऊन मते मिळवितात. कॉग्रेस पक्षातील नेत्यांनी धर्मातीत राज्याचा पुरस्कार केला असला तरी प्रत्यक्षात निवडणूकांच्या काळात धर्मांध शक्तींशी तडजोड व युक्ती केलेली आहे. जम्मू—काश्मीरमध्ये सत्ताप्राप्तीसाठी शेख अब्दुल्लांच्या पक्षाला विरोध करून हिंदूत्ववादी शक्तीशी संगनमत केले होते. केरळात कॉग्रेस पक्षाने मुस्लिम लीगशी व तंबुद्री ब्राम्हणवर्गाशी युती केली होते त्याचप्रमाणे पंजाबमध्ये अकाली दलाशी युती करून सत्ताचे राजकारण कॉग्रेस ने केले आहे. भारतीय जनता पक्षाने रामजन्मभूमी प्रकरणाचा वापर १९८९ च्या लोकसभा निवडणूकींत केला होता. रामजन्मभूमी, बाबरी मशीद वादामुळे भारतीय राजकारण धर्मनिरपेक्षता तत्वापासून बाजूला गेले आहे.

राजसत्तेच्या राजकारणाला अवास्तव महत्व प्राप्त झाल्यामुळे निवडणूकांना फारच महत्व प्राप्त झाले आहे. सत्ताप्राप्तीसाठी शक्तींचे धृवीकरण माठया प्रमाणत होताना दिसते. ऐकेकाळी ज्यांचा धर्मनिरपेक्षतेवर दृढ विश्वास होता असे जॉर्ज फर्नाडिस, नितीश कुमार, शदर यादव हे भाजपाचे सदस्य झाले कॉग्रेस पक्ष धर्मनिरपेक्षतेच्या नावावर मुस्लिम लीगला सांप्रदायिक मानता ‘सेक्युलॅरिस्टांच्या’ महत्वाच्या मिटींगध्ये निमंत्रण देऊन घेतात.

धर्म निरपेक्षतावादाचे विरोधक ज्या कृती करीत होते आणि ते आजही करीत आहेत त्यात अल्पसंख्यांकाची शत्रुप्रतिमा उभी करणे, ऐतिहासिक सुडाची भावना शिक्षणाचे भगवेकरण करणे, गोहत्या बंदी, धार्मीक संघटनांचा राजकारणातील हस्तक्षेप, धर्मनिरपेक्ष संविधानराबद्ल जनमानसात अनादर उत्पन्न व्हावी अशी समीक्षा करणे, मिळणाऱ्या सर्व व्यासपीठांच्या सोयीच्या राजकारणासाठी वापर करतात तर दुसरीकडे धर्मनिरपेक्षता वादयांनी काही गोष्टींकडे पुर्णत: दुर्लक्ष करून खाजगीकरणाचे व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले असले तरी देशातील गरीबी, बेकारी, विषमता इ. प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा परिस्थीतीत बेरोजगारांची स्थिती सुधारण्यासाठी जे समता न्यायवादी तत्वांवर आधारित राजकारण असावे लागते तसा पर्याय धर्मनिरपेक्षवादयांनी उपलब्ध करवून न दिल्यामुळे असंतुष्ट, गरीब घटक धर्मवादी राजकाराणाच्या सापळयात अडकला जातो.

आज तत्ववैचारिक पक्षांपेक्षा जात—धर्मवादी पक्षांचे आकर्षण वाढलेले आहे. संविधानाने भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले. परंतु भारतीय समाज मात्र एदयापही धर्मनिरपेक्ष झाला नाही. समाज धर्मनिरपेक्ष होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. सर्वसामान्यांसमोर नेत्यांच्या वर्तनकृतीचा आदर्श निर्माण व्हावा लागतो. अंधश्रध्दांची जागा वैज्ञानिक दृष्टीकोनाने घेतल्याशिवा धर्मनिरपेक्ष समाज निर्माण होऊ शकत नाही.

**धर्मनिरपेक्ष राष्ट्र/समाज करण्यासाठीचे उपाय :**

भारतात खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करावयाचे असेल तर सर्वच राजकीय पक्षांनी धर्माधतेचे राजकारण करण्याचे सोडून सत्ताप्राप्तीसाठी, सत्ता टिकविण्यासाठी आणि भांडवलदार वर्गाच्या हितासाठी धर्माधतेचा वापर करण्याचे धोरणर सोडून दिले पाहिजे.

शासकीय प्रसारमाध्यमांतून विविध धर्मांच्या तत्वांना आणि श्रध्दांना प्रसिध्दी दिलीर जाते वृत्तपत्रे, दुरदर्शन नभोवाणी या माध्यमांचा धार्मिक श्रध्दा, अंधश्रध्दांचे प्रसारण थांबविले पाहिजे. धर्मांधतेवर आधारलेल्या व राजकारण करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांवर व संस्था—संघटनांवर कायदयाने बंदी घातली पाहिजे, समान नागरी कायदा करून तो भारतातील सर्व नागरीकांना लागू करावा.

उपायात्मक मार्ग म्हणून धर्मनिरपेक्ष लोकशाही जागतिक भांडवलशाही आणि जात धर्म, पंथ वादाच्या दुहेरी संकटात अडकलेली असताना खऱ्या विश्वबंधुत्वासाठी, स्वांतत्र्य समतावादी लोकशाही मुल्यांच्या जोपासनेसाठीर धर्मनिरपेक्षते खेरीज आज दुसरा तरणेपाय नाही. हे जनतेला समजावून देणे नितांत गरजेचे आहे. धर्मनिरनेक्षाही एक मुल्य म्हणून हवी आहे. हिंदू व मुस्लिम अशा दोन्ही समाजातील जमातवादाच्या समर्थ कुकाबला होणे, अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण होणे आणि समान नागरिकात्वाच्या आधारावर लोकशिाहीचे सर्व व्यवहार चालणे गरजेचे आहे धर्मनिरपेक्षतेव्दारे या तिन्ही उदिष्टांची परिपूर्णता हाऊ शकते.

**सारांश :**

स्वातंज्यात्तर भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी धर्मनिरपेक्ष भारताची बांधनि केली. भारतीय घटनेने धर्मातील राज्याचा ( धर्मनिरपेक्षेचा) पुरस्कार केलेला आहे. सुरूवातील घटनेच्या तिसऱ्या विभागात मुलभूत अधिकार देऊन धर्मनिरपेक्ष राज्याच्या निर्मितीची अपेक्ष केलेली आहे तसेच २५ व २६ व्या कलमांमध्ये घटनेते धार्मिक स्वांतंज्याचा अधिकार स्पष्ट केला आहे. भारतीय राजकारणात आणि त्याचा परिणाम म्हणून समाजकारणात धर्मनिरपेक्षता ही संकल्पना दुषित झालेली आहे. निवडणूकीच्या राजकारणामुळे जात, संप्रदाय, धर्म अर्थ हयांचा सर्रास उपयोग केला जात आहे ध्येय, निष्ठा, त्याग, देशासाठी समर्पण हया गोष्टींना फारसा अर्थ उरलेला नाही. एकदंरीत, भारतीय समाज, परंपरागत हिंदुत्ववादी असल्यामुळे धर्मनिरपेक्षतेला धरून व्यवहार करीत असतो. परंतु शासकिय पातळीवर धर्मनिरपेक्षतेला काळिमा फासला जात आहे. मार्गदर्शक तत्वांमध्ये घटनाकारांनी धर्मनिरपेक्षतेचा जो सकारात्मक आशय भरलेला आहे. तो प्रत्यक्षात आणण्यासाठी समान नागरी कायदा करणे, रोजगाराची हमी देणे. आर्थिक विषमता नष्ट करणे, विज्ञान निष्ठा दृष्टिकोनाचा प्रसार करणे इ. मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे. अंमलबजावणी झाली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) व्होराराजेंद्र/ पळशीकर सुहास, राज्यशास्त्र कोश, दास्ताने प्रकाशन पुणे, १९८७.
२) देशमुख अलका,एकविसाव्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.
३) भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनन्टन प्रकाशन, पुणे.